जा.क्र./उमाशि-२/शिमा/पुवि/२०१३
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १. यांचे कार्यालय,
दि :- 6 DEC 2013

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये
वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये
पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रं. एचएससी-२०११/०१/११/उमाशि-१ दिनांक २६/५/२०११
२) शासन पत्र क्रं. एचएसएन १००७/(३६/०७)/माशि-२ दि. ६/२/२०१२
३) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक २०७५९-७२ दिनांक २२/८/२०१३
४) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, यांचे क्रं. रा.म./परिक्षा-२/६१७२/ दिनांक १७/९/२०१३
५) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक २७७३९-४६ दिनांक २३/१०/२०१३

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता शिबिर दिनांक २७/८/२०१३ ते १९/१०/२०१३ या कालावधीत प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. तसेच दिनांक २८/१०/२०१३ व दिनांक २९/१०/२०१३ रोजी जुन्नर व पिंपरी येथील कनिष्ठ महाविद्यालयात पुरवणी संच मान्यता शिबीर आयोजित करुन वेळापत्रकानुसार तीनही जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज पूर्ण झालेले आहे. शिबिराचे वेळापत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

तथापि अद्यापही काही कनिष्ठ महाविद्यालयाच्या कार्यभार निश्चिती पटपडताळणी प्रस्तावात त्रृटी असल्याने त्या प्रस्तावांवर कार्यवाही पूर्ण होवू शकलेली नाही. ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी अद्यापही संच मान्यता कार्यभार निश्चिती पटपडताळणी मधील त्रृटींची पूर्तता करुन घेतली नाही त्यांनी दिनांक १०/१२/२०१३ पूर्वी त्रृटींची पूर्तता करुन पडताळणी व संच मान्यता करुन घ्यावी. संच मान्यता झाल्याशिवाय बोर्डाचे परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच अशा कनिष्ठ महाविद्यालयांचे माहे डिसेंबर २०१३ पेड इन जानेवारी २०१४ चे वेतन देयके पारीत करण्यात येवू नयेत असे वेतन पथक कार्यालयास कळविण्यात येत आहे.

(बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत - माहिती व कार्यवाहीस्तव सादर
मा. अध्यक्ष / सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभाग, पुणे
/- ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी शै. वर्ष २०१३-१४ पटपडताळणी कार्यभार निश्चिती केलेली नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांचे इ. १२ वी चे परीक्षा आवेदन पत्रे स्वीकारु नयेत.

प्रत - माहिती व कार्यवाहीसाठी रवाना
१. शिक्षणाधिकारी / अधिक्षक (माध्यमिक)
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे / सोलापूर / अहमदनगर
२/- ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ची कार्यभार निश्चिती पटपडताळणी संच मान्यता अद्याप करु घेतलेली नाही त्या कनिष्ठ महाविद्यालयांची माहे डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ ची वेतन देयके पारीत होणार नाहीत याची दक्षता आपल्या स्तरावरुन घेण्यात यावी.